# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२५ सप्टेंबर २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)


# आर्थीक गुन्हे शाखेची कार्यवाही

## चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शाखा मेंडकी येथील फसवणुकीच्या गुन्हयात आरोपींना अटक

दिनांक २०/०७/२०२० रोजी फिर्यादी साजन किसन साखरे वय ४९ वर्षे, लेखा परिक्षक, सहकारी संस्था चंद्रपूर यांचे रिपोर्ट वरून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शाखा मेंडकी ता. ब्रम्हपुरी येथील मॅनेजर अमीत प्रभाकर नागपुरे, लिपीक संजय बाबुराव शेंडे दोन्ही रा. ब्रम्हपुरी यांचे विरूध्द पो.स्टे. ब्रम्हपुरी अप क्र. ३६०/२०२० कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ३४ भादंविचा गुन्हा दि. २२/७/२०२० चे २१:३० वा. दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयात यातील अटक आरोपी १) रविंद्र अंबादास भोयर वय ५९ वर्षे, रा. नागभिड, २) अमित महादेव राउत वय ३६ वर्षे, रा. ब्रम्हपुरी, ३) कल्पना रामकृष्ण मसराम वय ३५ वर्षे, रा. ब्रम्हपुरी यांनी शाखा मेंडकी येथे पदाचा दुरूपयोग करून स्वत:चे आर्थीक फायदयाकरीता शाखेतील खातेदार हे मयत झाल्याने त्यांचे खात्यावर असलेली रोख रक्कम तसेच शासनाकडुन आलेल्या निधीची रक्कम दुस-याचे खात्यात वळती करून त्या खातेदाराची डुप्लीकेट अंगठे, सही मारून रोख रक्कम उचल केलेली आहे. नमुद  आरोपीतांना अटक करून पीसीआर घेण्यात आला नमुद तिन्ही अरोपीतांकडुन अपहार केलेली रोख रक्कम १,३०,०००/-रु. जप्त करण्यात आले असुन नमुद आरोपीतांचा मा. न्यायालय ब्रम्हपुरी यांनी न्यायालयीन कोठडी रिमांड मंजूर केल्याने त्यांना चंद्रपूर कारागृहात दाखल करण्यात आले. यापुर्वी शाखा मेंडकी येथील अमीत नागापुरे शाखा व्यवस्थापक, संजय शेंडे लिपीक यांना अटक करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. अरविंद साळवे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक आर्थिक गुन्हे शाखा पोनि. श्री. प्र.के. मकेश्वर, सहायक फौजदार बिंदूप्रसाद चांदेकर हे करीत आहेत.

-----------------------------------------------------------